महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील तहसिलदार यांच्या मनमानी कारभाराबाबत

(१) ३३३२६ (०६-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील तहसिलदार, श्रीमती श्वेता चंदनमल संचेती (नोडल अधिकारी) यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, जळगांव तसेच महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-११-२०२२) : (१), (२) व (३) विना परवानगी बायोडिझेल किंवा तत्सम इंधन विक्री करणाऱ्यांवरील कारवाईत दिरंगाई होत असल्याच्या बाबीसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी केली होती. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी,जळगांव यांनी तहसिलदार, मुक्ताईनगर, जि.जळगांव यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार तहसिलदार, मुक्ताईनगर, जि.जळगांव यांनी मुक्ताईनगर तालुक्यातील अवैध बायोडिझेल विक्री करणाऱ्या संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा अहवाल सादर केल्याचे निदर्शनास येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव (जि.जळगांव) येथील बीएचआर पतसंस्थेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२) ३४१८० (१२-०१-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव (जि.जळगांव) येथील बीएचआर पतसंस्थेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जून,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव, धुळे आणि नाशिक महापालिकेतील ठेकेदार सारखेच असून ठेक्यातील भागीदारही बीएचआरशी संबंधित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैरव्यवहारासंबंधी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच आढळून येणाऱ्या संबधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (२४-११-२०२२) :(१) जळगांव येथील बीएचआर पतसंस्थेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे नोव्हेंबर, २०२० मध्ये उघडकीस आले आहे.

(२) जळगांव, धुळे आणि नाशिक महापालिकेशी संबंधीत असलेल्या ठेकेदारांचे जळगाव जिल्ह्यातील बीएचआर पतसंस्थेशी संबंध असल्याचे अद्यापपर्यंत निदर्शनास आले नाही.
(३) दिनांक २७.११.२०२० रोजी आर्थिक गुन्हे शाखा, पुणे यांनी संस्थेच्या कार्यालयात धाड टाकून संस्थेचे मुख्य कार्यालय सिलबंद केले. त्यानंतर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखा, पुणे यांनी दिनांक ०७.०६.२०२१ रोजी मुख्य कार्यालय उघडून दिले. परंतु संगणकातील महत्त्वाचा डाटा पुढील तपासाकरीता अद्याप पोलीसांच्या ताब्यात आहे. बीएचआर संस्थेचे माजी अवसायक श्री. जितेंद्र कंडारे व इतर असे एकुण १९ लोकांवर आर्थिक गुन्हे शाखा, पुणे यांनी गुन्हे दाखल केलेले असून सदर व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. सध्यस्थितीत सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिलेट्स (भरडधान्य)उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करण्याबाबत

(३) ३८३८९ (०९-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संयुक्त राष्ट्र संघांकडून २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार असल्याचे तसेच नीती आयोग आणि संयुक्त राष्ट्राच्या वर्ड फूड प्रोग्राम यांच्यात भरड धान्य उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी स्वारस्य करार झाल्याचे माहे डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मिलेट्स उत्पादनवाढीसाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना काय आहेत,
(३) असल्यास, भरडधान्य प्रक्रिया उद्योग उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२३-११-२०२२) : (१) होय, खरे आहे. संयुक्त राष्ट्र संघाकडून २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य" वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे.
(२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- अन्नधान्य पिके अंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांसाठी सन २०१८-१९ ते २०२१-२२ पर्यंत केंद्र व राज्य शासनाकडून मंजूर निधी, वितरीत निधी व खर्च खालील प्रमाणे आहे.

(रु.लाख)

अ.क्र	वर्ष	मंजूर निधी	वितरीत निधी	खर्च निधी	खर्चाची टक्केवारी
१	२०१८-१९	२१२५.००	१७३८.१७	११३१.०८	६५
२	२०१९-२०	२०९४.१५	१४७४.९१	११८०.३३	८०
३	२०२०-२१	३७३८.७२	३२४७.४६	२४४४.७५	७५
४	२०२१-२२	६८८२.००	४०९५.६०	४०३२.१०	९८
५	२०२२-२३	१०३२२.५०	-	-	-

पौष्टिक तृणधान्यांचे क्षेत्र व उत्पादन वाढीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.
१) सुधारित तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी या पिकांची पिक प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर आयोजीत केली जातात.
२) सुधारित जातीचे /वाणाचे बियाणे उत्पादनासाठी बियाणे उत्पादक यंत्रणांना उत्पादन अनुदान वितरीत करण्यात येते.
३) शेतक-यांना अनुदानावर सुधारित जातीचे /वाणाचे बियाणे वितरीत करण्यात येते.
४) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व एकात्मिक कीड व्यवस्थापन या बाबी खाली शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यात

येते.

५) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया युनिटसाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

सुधारित तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी शेतक-यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

(३) भरडधान्य प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी शासनाकडे स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही. तथापि, "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना" सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षाकरिता म्हणजे सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाअखेर पर्यंत चालू ठेवण्यास दिनांक १७ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करताना भरड धान्यावरील कृषि प्रक्रिया व मुल्यवर्धन यावर विशेष भर देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेतील कर्मचारी यांनी बँकेतील जीएसटीबाबत केलेला गैरव्यवहार

(४) ३९८४७ (०९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३१४ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महानगरपालिका कर्मचारी यांनी सहकारी बँकेकडे संगणक कर्जासाठी अर्ज करताना कर्मचाऱ्यांना कर्ज वाटपाचे धनादेश जीएसटीसह देण्यात आले मात्र संगणकासाठी सादर केलेले कोटेशन बनावट फर्मचे असल्याने शासनाचा जीएसटी कर बुडाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदरील बनावट फर्मवर व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (२४-११-२०२२) : (१), (२) व (३)

नागपूर महानगरपालिका कर्मचारी सहकारी बँक मर्या., नागपूर या बँकेच्या संगणक कर्ज वाटप प्रकरणात झालेल्या अनियमीततेसंदर्भात बँकेच्या भागधारकांनी दिनांक २३.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक २४.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरणाचे चाचणी लेखापरिक्षण करण्याकरीता श्री. एन.बी. कोंडावार, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, नागपूर यांची नियुक्ती केली.

सदर लेखापरिक्षणात आढळून आलेली आर्थिक अनियमितता व बँकेची फसवणूक या करीता संबंधीतांविरुध्द तक्रार दाखल करण्याकरीता श्री. एन.बी. कोंडावार पोलीस स्टेशन, कोतवाली येथे गेले असता, शासकिय अभियोक्ता यांचे लेखी मत घेऊन तक्रार दाखल करण्याबाबत पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कळविले.

त्यानुसार शासकीय अभियोक्ता मा. जिल्हा सत्र न्यायालय, नागपूर यांच्या अभिप्रायाकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला. शासकिय अभियोक्ता यांनी, संगणक कर्जाची संपुर्ण रक्कम व्याजासहीत वसूल झालेली आहे, तसेच कोणत्याही प्रकारची अफरातफर दिसून येत नसुन फक्त अनियमितता असल्यामुळे बँकेच्या तसेच कर्मचाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल होऊ शकत नसल्याचे अभिप्राय दिले असल्याने संबंधीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

४) प्रश्न उद्भवत नाही.

संख (ता. जत, जि.सांगली) येथील अप्पर तहसील कार्यालयाचा कारभार
जलसंपदा विभागाच्या बंद पडलेल्या खोलीत सुरु असल्याबाबत

(५) ३९८४९ (०७-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत तालुका (जि.सांगली) कर्नाटक राज्याच्या सिमेला लागलेला असून तेथे नेहमी दुष्काळ, सिंचन व विकास कामांचा अमागासपणा असल्यामुळे संख,अप्पर तहसील कार्यालयाच्या निर्मितीनंतर ६५ गावांचा गावपाडा सुरळीत चालावा या धर्तीवर इतर कार्यालयांची निर्मिती, अधिकारी व कर्मचा-यांचा अनुशेष भरुन निघेल तसेच नागरीकांचे स्थानिक प्रश्न सुटतील असा विश्वास होता, परंतु सद्य:स्थितीत अप्पर तहसिलदार म्हणून येणारा अधिकारी येथील एकूण परिस्थितीत कार्यालयीन कामचा वाढता बोजा लक्षात घेऊन वर्षभरातच दुस-या ठिकाणी बदली करुन घेत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संख, अप्पर तहसील कार्यालयाचा कारभार जलसंपदा विभागाच्या बंद पडलेल्या खोलीतून सुरु असुन ४० गुंठ्याच्या जागेवरील इमारत हस्तांतराणाचा प्रस्ताव दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविला असता तीन वेळा अप्पर कार्यालयाकडून पाठपुरावा करुनही अद्यापही कार्यवाही झाली नसल्याने या कार्यालयात कामानिमित्त येणा-या नागरिकांची प्रामुख्याने शेतक-यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-११-२०२२) : (१) मौजे संख, ता.जत, जि.सांगली येथील अपर तहसिल कार्यालय दि.२६.०१.२०१८ पासून कार्यन्वित करण्यात आले असून, सदर ठिकाणी तहसिलदार या पदावर वेळोवेळी सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने संबधित अधिका-यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) अप्पर तहसिलदार कार्यालय, संख, हे कार्यालय लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकार क्षेत्रात असणा-या एका खोलीमध्ये सुरु करण्यात आले असून, लघु पाटबंधारे विभागाच्या ताब्यात असलेल्या गट सर्व्हे नंबर १/३ मधील प्रथम ०.४४ हे क्षेत्राचा मागणी प्रस्ताव व भविष्यात स्वतंत्र तालुका होण्याचे कारण,निवडणूक, वाहनतळ/जप्त वाहने तळ,अधिकारी निवास्थान यासाठी भविष्यात लागणा-या जागेचा विचार करुन तत्कालीन तहसिलदार यांनी २.५० हे. क्षेत्राचा प्रस्ताव मोजणीकामी सादर केलेला होता. त्याप्रमाणे सदर जागेची मोजणी झाली असून, कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग यांच्याकडून मोजणी नकाशासह अहवाल व नाहरकत दाखला यासह जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ऐतिहासिक वास्तूंचे जतन करुन संवर्धन, पुर्नबांधणी व सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत

(६) ४०५१८ (१२-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिटिशकालीन वखारी,कातळ शिल्पे तसेच शिवकालीन गढी आदि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करुन संवर्धन व पुर्नबांधणी, सुशोभिकरण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,रत्नागिरी जिल्हयातील राजापूर व लांजा तालुक्यातील ब्रिटिशकालीन वखारी,कातळशिल्पे तसेच लांजा तालुक्यातील शिवकालीन गढी आदि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करुन संवर्धन व पुर्नबांधणी तसेच सुशोभिकरण केल्यास कोकणात पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पर्यटन, पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्रव्यवहार करुन ऐतिहासिक वास्तूंचे जतन करुन संवर्धन व पुर्नबांधणी तसेच

सुशोभिकरण करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे ओह काय,
(४) असल्यास,सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-११-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

राजापूर, जि. रत्नागिरी येथील ब्रिटीशकालीन वखार व लांजा, जि.रत्नागिरी येथील शिवकालीन गढी असंरक्षित स्मारक आहे. राजापूर येथील ब्रिटीशकालीन वखारीची प्रत्यक्ष पाहणी सहायक संचालक, पुरातत्व विभाग, रत्नागिरी यांनी केली आहे. सद्यस्थितीत वखारीचे फक्त जोत्यापर्यंतचे अवशेष शिल्लक आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील १७ कातळशिल्पांच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड) येथे तहसील कार्यालयात जन हिताची कामे करत नसल्याबाबत

(७) ४३००७ (१२-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील तहसील कार्यालयाला स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विविध विषयाबाबत तहसीलदार यांना दूरध्वनीद्वारे, पत्राद्वारे वारंवार पाठपुरावा केला मात्र तहसीलदार श्री. विपिन पाटील यांनी कुठलीही कार्यवाही केली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाईचे तहसीलदार हे प्रत्येक विषयावर टोलवाटोलवी करत असून लोकप्रतिनिधींच्या पत्रावर स्वत:च्या अधिकाराचा निर्णय घेत असून फक्त संबंधित विभागास औपचारिकता म्हणून पत्र पाठवितात त्यामुळे त्यांना तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सुचवलेल्या पत्रावर कुठलेही गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या नियमाप्रमाणे, निर्णय घ्यावेत म्हणून त्यातील काही पत्रांचा दिनांक, जावक नंबर व विषय ज्यामध्ये तहसीलदार यांनी कुठलीच कार्यवाही केली नाही अशी पत्रे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे पाठवले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रत्यक्षात या सर्व विषयाबाबत निर्णय घेणे अपेक्षित असून तहसिलदार हे जाणीवपूर्वक जनतेच्या व शासनाच्या हिताची कामे तसेच स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी सुचवल्याप्रमाणे शासन नियमाप्रमाणे काम करत नसल्याबाबत सदर प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-११-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) तहसिलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांच्या कार्यपध्दतीवर व कामकाजाबाबत आक्षेप उपस्थित करणारे मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ०७.०२.२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनातील आक्षेपांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बीड यांचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यामार्फत प्राप्त झालेला असून, सदर अहवालानुसार मा.लोकप्रतिनिधी यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या संदर्भावर संबंधित तहसिलदार यांच्याकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील नवयुग को.ऑप हौसिंग सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

(८) ४३०६१ (०९-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील नवयुग को.ऑप हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष आणि इतर सभासदांविरुध्द उपनिबंधक सहकारी संस्था, पी.विभाग, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ मध्ये सदर सोसायटीच्या सदनिका क्रमांक अ/४०७ मध्ये स्लॅब कोसळण्याची घटना घडली असून संस्थेचे उपविधी, २०१४ मधील कलम १५८ (अ) (१७) (by-laws of Maharashtra housing society) नुसार सदर घराचे मालकी हक्क असलेल्या वृध्द महिलेने घराचे स्लॅब दुरुस्त करण्याबाबत सोसायटीकडे तक्रार अर्ज तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मागणी करुनही सोसायटी अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी कोणतीही दखल न घेतल्याने सदनिकेच्या छताची दुरुस्ती न केल्यास छत कोसळून जीवीतहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सोसायटीच्या अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांना संस्थेचे उपविधी क्र.१५८ (अ) (१७) नुसार उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सदनिकेच्या छताची दुरुस्ती करुन देण्याबाबत आदेश पारीत करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सोसायटीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी देखभाल दुरुस्तीच्या निधी मधून सोसायटीकरिता करण्यात येणाऱ्या खर्चामध्ये बनावट देयके तसेच अतिरिक्त खर्च झाल्याचे दाखवून सोसायटीच्या अनेक सदस्यांच्या पैशांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाकरीता सोसायटीने मासिक मेन्टनन्समध्ये वाढ करुनही तसेच सदर सोसायटीचे वार्षिक उत्पन्न जवळपास २१ लाखांच्या आसपास असूनही सदर वृध्द महिलेच्या घरातील स्लॅबची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पैशाचा गैरव्यवहार करणाऱ्या नवयुग को.ऑप हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांचेवर कारवाई करुन तक्रारदार महिलेच्या घरातील स्लॅब दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०७-११-२०२२) :(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात अंधेरी, बोरीवली व कुर्ला विभागात एकूण २६ दस्त नोंदणी कार्यालये असल्याबाबत

(९) ४४५८७ (०७-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात ५, अंधेरी विभागात ८, बोरीवली विभागात ९ व कुर्ला विभागात ४ अशी एकूण २६ दस्त नोंदणी कार्यालये मुंबईत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी नागरीक कार्यालयात येत असताना सर्व्हर डाऊन होणे तसेच अनेक वेळा मुद्रांक शुल्काकरीता अडचणी येत असून कार्यालयातील आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा नसल्यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे यासंदर्भात नागरिकांकडून व्यवस्थापनाकडे तक्रारी करण्यात येत

आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दस्त नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयात येणाऱ्या नागरीकांना सुविधा उपलब्ध व्हाव्यात व दस्त नोंदणीचे व्यवहार पूर्ण व्हावेत याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नोंदणी विभागाच्या सर्व्हरवर एकाचवेळी राज्यातील सर्व कार्यालयांकडून नोंदणी प्रक्रीया सुरु झाल्यास काही वेळेस सर्व्हरवर तांत्रिक अडचण निर्माण होते, हे अंशत खरे आहे.
ही बाब निदर्शनास आल्यास वरिष्ठ पातळीवरुन दखल घेवून, तांत्रिक अडचण दूर करुन नोंदणीची प्रकीया पूर्ववत केली जाते. दस्त नोंदणीस येणाऱ्या पक्षकारांचा दस्त त्याच दिवशी नोंदणी पूर्ण केला जातो. त्यामुळे दस्त नोंदणीकरिता पक्षकार यांना वारंवार कार्यालयात यावे लागते, हे खरे नाही.
(३) मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील बहुतेक सह दुय्यम निबंधक कार्यालये ही एम.टी.एन.एल व खाजगी इमारतीत भाडयाने असून जनतेकरिता पक्षकारांसाठी बैठक व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व प्रसाधनगृह सुविधा उपलब्ध असल्यामुळे नागरिकांची कोणतीही गैरसोय होत नाही. तसेच सुविधांबाबत तोंडी अथवा लेखी तक्रार नोंदणी कार्यालयास प्राप्त नाही.
विभागाचे स्तरावरुन नोंदणी प्रक्रीया जलद व सुलभ होण्याकरिता मुद्रांक शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा तसेच विकासकाकडून घेण्यात येणाऱ्या सदनिकेचा मिळकतीचा प्रथम दस्त नोंदणीकरिता ऑनलाईन सुविधा, लिव्ह ॲण्ड लायसन्स दस्त,ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. तथापि,एम.टी.एन.एल कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली कनेक्टीव्हीटी खंडीत झाल्यास दस्त नोंदणीस व्यत्यय येऊ नये,यासाठी सर्व सह.दुय्यम निबंधक कार्यालयात या सेकंडरी कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून त्यामुळे पक्षकाराचे दस्त नोंदणी करताना अडचण निर्माण होत नाही.
तसेच दस्त नोंदणीकरिता वापरण्यात येणाऱ्या आय सरिता या सर्व्हरशी Pan, E-KYC,LR Grass व DHC इ.सर्व्हर जोडले गेलेले आहेत. यापैकी एखादे सर्व्हर SLOW/बंद असले तरीही दस्त नोंदणीचे काम बंद पडते. सर्व्हरविषयक तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यासाठी नोंदणी कार्यालयात Command and Control रुममध्ये सर्व्हरविषयक अडचणीचे तात्काळ निराकरण करणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. सल्लांगारामार्फत सर्व्हर, नेटवर्क, हार्डवेअर इ. कामकाजावर सातत्याने नियंत्रण ठेवले जात असून सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना Secondary Connectivity चा पुरवठा करण्यात आलेला आहे. दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीच्या वेळी हार्डवेअर/सॉप्टवेअर विषयी येणाऱ्या अडचणीचे निरकारण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक कार्यालयाच्या स्तरावर System Support Engineer यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विभाजन होवून स्वतंत्र खानदेश कृषी विदयापीठ निर्माण करण्याबाबत

(१०) ४४७३५ (०७-११-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा कोल्हापूर व नाशिक हे प्रगत जिल्हे तर खान्देशातील जळगांव, धुळे व नंदूरबार हया मागास जिल्हयांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र, पीक पध्दती, हवामान, मान्सून व खान्देश विभागाचे सिंचन क्षेत्र, पीक पध्दती, हवामान, मान्सून यात मोठी तफावत आहे त्यामुळे या विद्यापीठातंर्गत होणारे नविन संशोधन पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयानांच फायदेशीर ठरते त्याचा खान्देशातील जिल्हयांना फारसा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरीत महाराष्ट्र असे तीन विभाग पाडले आहेत त्यात मराठवाडा

आणि विदर्भाला स्वतंत्र कृषी विद्यापीठ असून उर्वरीत महाराष्ट्रात कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देश या भागाचा समावेश होतो, त्यात कोकणाला स्वतंत्र कृषी विद्यापीठ आहे, तर राहुरी कृषी विद्यापीठ हे पश्चिम महाराष्ट्रासाठी उपयोगी आहे परंतू केवळ खान्देशासाठी स्वतंत्र विद्यापीठ नसल्याने जनतेमध्ये शासनाप्रती असंतोष पसरला असून याबाबत शासनाने नविन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) :(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार या दहा जिल्ह्यांचा समावेश होतो.
(२) व (३) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत होणारे नविन संशोधन हे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांना फायदेशीर ठरत आहे. धुळे जिल्ह्यात कृषि संशोधन केंद्र, गवत संशोधन केंद्र, अखिल भारतीय समन्वित बाजरी संशोधन केंद्र तसेच शासकीय कृषि महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय, कृषि विज्ञान केंद्र कार्यरत आहेत. जळगाव जिल्ह्यात तेलबीया संशोधन केंद्र, केळी संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालय मुक्ताईनगर, कृषि तंत्र विद्यालय, कृषि विज्ञान केंद्र कार्यरत आहे. तसेच नंदुरबार जिल्ह्यात कृषि महाविद्यालय, कृषि विज्ञान केंद्र कार्यरत असून या केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी मेळावे, प्रशिक्षण भेटी, प्रशिक्षण प्रात्यक्षिके इत्यादी कृषि विस्ताराचे कार्य केले जात आहे. त्याचप्रमाणे पिक पध्दती, सिंचन क्षेत्र, हवामान, मान्सून या सर्व गोष्टींचा विचार करून कृषि विषयक माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येते.

राज्यात नविन कृषि, विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात डॉ.वाय.एस.पी.थोरात समिती व डॉ.बी.व्यंकटेश्वरलू समिती स्थापन करण्यात आली होती. तथापि या संदर्भात अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हॉटेल साईराज व साईदर्शन या बार सुरु करण्यास दिलेली परवानगी

(११) ४४९०६ (०९-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कायद्याचे उल्लघंन केलेल्या हॉटेल साईराज व साईदर्शन या दोन लेडिज बारवर बंदी आणण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक संस्थांनी अनेक तक्रारी जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे केली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाने या दोन्ही लेडीजबार वर छापे घालून तपासणी केली असता अनेक त्रुटी आणि विसंगती बरोबर अनुचित प्रकार आढळून आल्यामुळे बार मालकांना नोटीसा देवून दंडात्मक कारवाई करण्यात आली असतानाही संबंधीत विभागाने पुन्हा बार सुरू करण्याची दिलेली परवानगी जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले व तद्अनुषंगाने दोषी असलेल्या दोन बार मालकांना परवानगी देणाऱ्या संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (३०-११-२०२२) : (१) (२) व (३) कोन, ता. पनवेल, जि. रायगड येथील राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत देण्यात आलेल्या परवानाकक्षाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत हॉटेल साईराज, एफएल-३ अनुज्ञप्ती क्र. २७१ व हॉटेल साईदर्शन, एफएल-३ अनुज्ञप्ती क्र. ३५८ या अनुज्ञप्त्यांवर विभागीय विसंगती प्रकरणे नोंद केली होती. सदर विसंगतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे आदेश दिनांक

२८.३.२०२२ अन्वये सदर अनुज्ञप्त्या कायमस्वरुपी रद्द करण्यात आल्या होत्या.

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाविरुध्द अनुज्ञप्तीधारकाने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे अपिल दाखल केले असता, आयुक्तांनी, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम,१९४९ मधील तरतुदीनुसार त्यांना प्राप्त अर्धन्यायिक अधिकारात दिनांक १०.५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये अपिल मान्य करुन प्रत्येकी रु. १.०० लक्ष दंड आकारण्याचे आदेशित केले. त्यानुसार संबंधितांकडून दंड वसुल करण्यात आला असून सदर अनुज्ञप्तींचे व्यवहार पुर्ववत सुरु करुन देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सहकार विभागाने स्वतंत्र आदर्श लेखापरिक्षण मसुदा जारी केल्याबाबत

(१२) ४४९९५ (२१-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व नागरी सहकारी पतसंस्थांमधील गैरव्यवहार व बनावट कागदपत्रांद्वारे केले जाणारे सर्व अपहार समोर येण्यासाठी पतसंस्थांच्या वार्षिक कारभाराचे लेखापरीक्षण चोखपणे होण्याकरिता त्रुटी ठकळपणे समोर याव्यात म्हणून सहकार विभागाने स्वतंत्र आदर्श लेखापरिक्षण मसुदा जारी केला असल्याची माहिती दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लेखापरिक्षकांना संस्थेत झालेला गैरव्यवहार, ठळकपणे नोंद करावी लागणार असुन सदरच्या गैरव्यवहारामुळे झालेले आर्थिक नुकसानही दाखवणे बंधनकारक केले असल्यामुळे पतसंस्थांमधील गैरव्यवहारांना निर्बंध बसणार असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जारी करण्यात आलेल्या मसुद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (२४-११-२०२२) : (१) व (२) होय.

(३) राज्यातील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा व त्याबाबतचे परिपत्रक सहकार आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०४.०४.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर लेखापरीक्षणाचा आदर्श मसुदा सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून पुढे लागू केलेला असून या मसुद्याप्रमाणेच राज्यातील लेखापरिक्षकांना पतसंस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर परवानगी न घेता वाळूचे उत्खनन केले जात असल्याबाबत

(१३) ४५०१९ (०४-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई,जि.पालघर) येथील अर्नाळा समुद्र किना-यावर कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता वाळूचे उत्खनन केले जात असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, बेकायदा मार्गाने उपसा करण्यात येत असलेली वाळूची वाहतुक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्र किना-यावरील भागातून केल्या जाणा-या वाळू उपसामध्ये समुद्र किनारा धोकादायक होत आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार वाळू उपसा रोखण्यासाठी महसूल व पोलीस विभाग यांच्यामार्फत विशेष पथक तयार करुन गस्त घालण्यात यावी अशी विनंती स्थानिक नागरिकांनी केली , हे ही खरे आहे काय,
(५) उक्त अवैध वाळू उपसा थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-११-२०२२) : (१) व (२) विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील अर्नाळा सागरी किनारी रात्री अपरात्री होणारे वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी अर्नाळा पोलीस ठाणे येथे दिनांक ८/४/२०२२ व दिनांक २०/४/२०२२ रोजी २ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) व (४) अशी बाब आढळून आली नाही.
(५) गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. त्यानुसार पालघर जिल्ह्यामध्ये दि.१/४/२०२२ ते ३०/६/२०२२ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३१ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.९,७४,९७,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ५ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हयातील अंबरनाथ आणि बदलापूर येथील रजिस्ट्रेशन कार्यालयातील अडगळीबाबत

(१४) ४५०२१ (२७-१०-२०२२). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुद्रांक शुल्क व दस्त नोंदणी (रजिस्ट्रेशन कार्यालय) अत्यंत अडगळीच्या ठिकाणी असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांकरिता कोणत्याही सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शासनाने रजिस्ट्रेशन कार्यालय शहरी ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी व नागरिकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही

अंबरनाथसाठी दुय्यम निबंधक कार्यालय हे उल्हासनगर येथील क्र.३ हे कार्यालय असून ते तहसिल कार्यालयाचे आवारात शासकीय इमारतीत आहे. तसेच बदलापूर पूर्व येथील सह दुय्यम निबंधक उल्हासनगर क्र.२ (२०३५.२५ चौ.फूट जागेत) व बदलापूर पश्चिम येथील सह दुय्यम निबंधक उल्हासनगर क्र. ४ (२००० चौ.फूट जागेत) ही कार्यालये खाजगी जागेत कार्यरत असून सदरहू तिनही कार्यालयीन जागेत अभ्यांगत कक्षासह किमान सुविधा उपलब्ध आहेत.

(३) बदलापूर परिसरात शासकीय भूखंड उपलब्ध होण्याकरिता मा.उपविभागीय अधिकारी तथा वसाहत अधिकारी, उल्हासनगर यांचेकडे पाठपुरावा सुरु असून भूखंड उपलब्ध होताच त्यावर स्वतंत्र इमारत बांधून बदलापूर येथील सह दुय्यम निबंधक उल्हासनगर क्र. २ व ४ ही दोन्ही कार्यालये एकाच ठिकाणी स्वतंत्र वेळामध्ये सुरु ठेवून नागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्याचे प्रयोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केज (जि.बीड) तालुक्यातील नायब तहसिलदाराने जिवंत असलेल्या महिलेस मयत दाखवून तिचे मृत्यू प्रमाणपत्र दिल्याबाबत.

(१५) ४५०३० (०१-११-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यात जिवंत असलेल्या नायब तहसिलदार महिलेस मयत दाखवून तिचे मृत्यू प्रमाणपत्र दिल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) : (१) अशा आशयाची तक्रार शासनास प्राप्त झालेली आहे हे खरे आहे.

(२), (३) व (४)

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचा अहवाल व सोबतची कागदपत्रे विचारात घेता मुख्याधिकारी, चाळीसगाव, जि. जळगाव यांनी दिनांक ०१.१२.२०२१ रोजी दिलेल्या मृत्यु प्रमाणपत्रावर श्रीम. आशा दयाराम वाघ, मयत या व्यक्तीचे नाव असून, मृत्यु समयी त्यांचे वय १५ वर्ष दर्शविण्यात आलेले आहे.

याउलट तहसिल केज येथे कार्यरत असलेल्या श्रीम. आशा वाघ यांचा जन्म दिनांक दिनांक ०६.०८.१९८४ असा असून त्यांनी २००४-०५ साली पदवी परीक्षा पास होवून सन २०१२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नायब तहसिलदार पदावर निवड झालेली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरून श्रीम. आशा दयाराम वाघ यांचे वय ३८ वर्ष असल्याचे दिसून येते. यावरून दि.१५.०५.२००४ रोजी मयत झालेली व्यक्ती व नायब तहसिलदार या पदावर असलेली व्यक्ती यांच्यामध्ये नामसाधर्म्य असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

बीड जिल्ह्यातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१६) ४५१२१ (०६-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात कृषी विभागात मंडळ कृषी निरीक्षक व कृषी सहायक यांच्यासह इतर जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच केज तालुक्यात मंजूर असलेल्या ८४ पदांपैकी ५१ पदे भरलेली असून विविध ३३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बीड जिल्ह्यातील कृषी कार्यालयातील रिक्त पदाचा परिणाम शेतकऱ्यांच्या कामावर होत असून शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहचत नसून पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहत असल्यामुळे कृषीविषयी मार्गदर्शन कृषी विभागामार्फत शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शेतीच्या शुल्लक कामासाठीही शेतकऱ्यांना कृषी कार्यालयात ये-जा करावे लागत असल्यामुळे शेतकरी त्रस्त झाले असून कृषी विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ११ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

बीड जिल्ह्यामध्ये कृषि विभागाची गट-अ ते गट-ड संवर्गाकरिता एकूण ८८८ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ५०० पदे भरलेली व ३८८ पदे रिक्त आहेत.

वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची (कृषि सेवेतील) ५९८ पदे मंजूर असून त्यापैकी ४१७ पदे भरलेली तर १८१ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे.

बीड जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त केज तालुक्यात कृषि विभागाची एकूण ८४ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ५१ पदे भरलेली व ३३ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. उक्त पदांचा समावेश असलेली तांत्रिक संवर्गातील (कृषि सेवा) बहुतांश पदे भरलेली आहेत. तसेच रिक्त असणाऱ्या काही पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) व (५)

कृषि विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्का.मा.मंत्री(कृषि) यांच्याकडे केलेली आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गामध्ये दि.१८.११.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने ९ अधिकाऱ्यांना बीड जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. सदर पदांकरिता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील उर्वरित रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यात येतील.

वित्त विभाग शा.नि.दि.३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नानाजी देशमुख कृषी संजिवनी (पोकरा) योजनेअंतर्गत गोदामाच्या कामात लाच स्विकारताना एका अधिकाऱ्याला अटक केल्याबाबत

(१७) ४५१६८ (०१-११-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८-१९ या कालावधीमध्ये राज्यातील शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी शासनाने नानाजी देशमुख कृषी संजिवनी (पोकरा) योजना राज्यात सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतून अकोला जिल्ह्यातील मौ.धनकवडी(ता.अकोट जि.अकोला) येथील शेतकऱ्यांना बियाणे साठवण गोदामाच्या पुर्वसंमती बांधकामासाठी तेथील विषयतज्ञ अधिकारी श्री. देहूल वासनिक यांनी ७० हजाराची लाच मागितल्याचे व शेतकऱ्यांने ३० हजार रुपये लाच दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सदर शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यावर विषयतज्ञ अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालय परिसरात सापळा रचून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी ३० हजार रुपयांची रोख रक्कम घेताना पकडल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अकोला जिल्ह्यात कृषी विभागात जबाबदार अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने सध्या कार्यरत असलेले अधिकारी शेतकऱ्यांची अडवणूक करुन मनमानी कारभार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत व रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२५-११-२०२२) : (१) विदर्भातील ६ जिल्हे, मराठवाडयातील ८ जिल्हे व जळगाव जिल्हा याप्रमाणे एकुण १५ जिल्हयातील ५१४२ गावांमधील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करण्यासाठी व शेती व्यवसाय किफायतशील करण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाची (पोकरा) अंमलबजावणी दिनांक १७ जानेवारी, २०१८ पासून करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे आहे

(४) व (५) अशी वस्तुस्थिती नाही,

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अकोला जिल्हा/उपविभागातील ५ नियमित पदांपैकी ३ पदे व ५७ कंत्राटी पदांपैकी ५५ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित ४ रिक्त पदे विहित प्रक्रियेद्वारे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब (जि.उस्मानाबाद) येथील तालुका कृषी कार्यालयातील कृषी मंडळ अधिकाऱ्यांच्या चारपैकी तीन जागा रिक्त असल्याबाबत

(१८) ४५३९९ (०७-१०-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) येथील तालुका कृषी कार्यालयातील कृषी मंडळ अधिका-यांच्या चारपैकी तीन जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागा रिक्त असल्याने दोन कृषी मंडळातील ६३ गावांचा कारभार एक मंडळ अधिकारी पाहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जागा रिक्त असल्याने याचा कामावर परिणाम होत असल्याने ती भरण्याची मागणी शेतक-यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

तालुका कृषि अधिकारी, कळंब जि.उस्मानाबाद कार्यालयाच्या अधिनस्त महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गातील (कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी) ४ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद भरलेले असून ३ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४)

दरम्यानच्या कालावधीत शासन आदेश दिनांक १८.११.२०२२ अन्वये कृषि पर्यवेक्षकांना महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गात पदोन्नती देण्यात आली असून या आदेशामधील एका कृषि अधिकाऱ्यास तालुका कृषि अधिकारी, कळंब जि.उस्मानाबाद कार्यालयाच्या अधिनस्त पदस्थापना देण्यात आली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत तालुका कृषि अधिकारी, कळंब कार्यालयातील कृषि अधिकाऱ्यांची २ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. तसेच या कार्यालयातील कृषि पर्यवेक्षकांच्या ७ मंजूर पदांपैकी सर्व पदे भरलेली असून कृषि सहाय्यकांच्या ३७ मंजूर पदांपैकी ३२ पदे भरलेली आहेत.

त्यामुळे तालुका कृषि अधिकारी, कळंब जि.उस्मानाबाद कार्यालयाच्या अधिनस्त अन्य २ रिक्त कृषि अधिकारी पदांचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून कृषि विभागाच्या विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना वेळेत दिला जात आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवाच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता (कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी) कृषि सेवा परीक्षा २०२१ करीता १२३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता ६५ अशा एकूण १८८ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी, कळंब जि.उस्मानाबाद कार्यालयाच्या अधिनस्त कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शेती क्षेत्रामध्ये बोगस कृषी सल्लागारांची वाढ झाल्याबाबत

(१९) ४५५६८ (०१-११-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती क्षेत्रामध्ये बोगस कृषी सल्लागारांची वाढ झाली असून कृषिविषयक तांत्रिक शिक्षण नसताना ते खेडोपाडी शेतक-यांच्या बांधावर जाऊन शेतक-यांना अधिक उत्पन्न, कमी खर्च, रोग किडीवर नियंत्रण याचे महत्व पटवून देऊन खोटे आमिष दाखवून स्वतःच्या फायद्यासाठी महागडी व निरुपयोगी औषधे शेतक-यांच्या माथी मारुन त्यांची आर्थिक लूट करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोगस कृषी सल्लागारांच्या सल्ल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊन ते कर्जाच्या विळख्यात सापडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणूक करणा-या बोगस कृषी सल्लागारांवर कृषी विभागाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतक-यांकडून संबंधित कृषी अधिका-यांकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन बोगस कृषी सल्लागारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१८-११-२०२२) : (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही व अशी तक्रार प्राप्त नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

देवगड (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी येथे मच्छीमारांच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या जेटी बंदर प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(२०) ४५६२५ (२८-०६-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ): सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी येथे मच्छीमारांच्या दृष्टीने महत्वाचे बंदर असलेल्या जेटी प्रकल्पाचे काम माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण होणे अपेक्षित असताना सदर प्रकल्पाचे काम सद्य:स्थितीत बंद अवस्थेत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू बंदराचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-११-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नंदुरबार, धुळे व जळगाव जिल्ह्यांत एचटीबीटी बियाण्यांची विक्री सुरू

(२१) ४५९६४ (२७-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे १ जून, २०२२पर्यंत कापसू बियाणे विक्री आणि लावणीला बंदी असतानाही एचटीबीटी कापूस बियाण्यांची नंदुरबार, धुळे व जळगाव जिल्ह्यांत विक्री सुरू असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनीचे प्रतिनिधी, काही बियाणे विक्रेते, गावातील पानटपरीवाले व किराणा दुकानदार गावपुढारी यांच्या माध्यमातून बियाणे विक्री करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (३०-११-२०२२) :(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) होय,

राज्यात खरीप २०२२ हंगामात अनधिकृत कापूस बियाणे / एच.टी.बी.टी. बियाण्याची विक्री होवु नये याकरीता कृषि विभागाच्या सहकार्याने विविध उपाययोजना करण्याच्या सुचना राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलिस अधिक्षक यांना कृषि आयुक्तालय स्तरावरुन दिनांक १८.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

खरीप हंगाम २०२२ मध्ये बोगस / अनधिकृत एच.टी.बी.टी.कापूस बियाणे विक्री होऊ नये यासाठी भरारी पथकांची स्थापना केली आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करतांना अधिकृत परवाना धारक बियाणे विक्रेत्यांकडून पक्क्या बिलाने बियाणे खरेदी करावे असे आवाहन करण्यात आले होते.

बियाणे निरिक्षकांमार्फत संशयास्पद वाटणाऱ्या अनधिकृत विक्री स्थळांची माहिती प्रगतीशील शेतकरी, कृषि मित्र व निविष्ठा विक्रेते यांचेकडून घेण्यात येते.

बोगस / अनधिकृत एच.टी.बी.टी. कापूस बियाणे आढळून आल्याने विभागीय व जिल्हाभरारी पथकामार्फत सापळा रचून नंदुरबार जिल्ह्यात रु.१.११ लाख इतक्या मुल्याचे ९७ एच.टी.बी.टी. कापूस बियाणे पाकिटे जप्त केली असून या संदर्भात १ फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धुळे जिल्ह्यामध्ये रु.६२ हजार मुल्याचे ४३ एच.टी.बी.टी. कापूस बियाणे पाकिटे जप्त केली असून २ फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

जळगाव जिल्ह्यात रु.५.८० लाख मुल्याचे ४६४ एच.टी.बी.टी. कापूस बियाणे पाकिटे जप्त केली असून ४ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लांजा व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात नविन शासकीय कार्यालयांकरिता इमारत मंजूर करणेबाबत

(२२) ४५९७२ (०१-११-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पोलीस स्टेशन अशी संयुक्त नवीन इमारत मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालय, राजापूर या कार्यालयाच्या इमारती बांधकामाबाबत कार्यकारी अभियंता, उत्तर रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांनी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई, यांच्याकडे इमारतीचे नकाशे तयार करुन मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयाच्या इमारती बांधकामाकरीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब कार्यवाहीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषि यांत्रिकीकरणांतर्गत ट्रॅक्टर व ट्रॅक्टरचलीत अवजारासंदर्भात सोशल मिडियावर अफवा पसरली असल्याबाबत

(२३) ४६०३३ (०१-११-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषि यांत्रिकीकरणांतर्गत ट्रॅक्टर व ट्रॅक्टरचलीत अवजारांकरिता अर्ज भरण्यात येत असल्याच्या अफवेमुळे शेतकरी अडचणीत सापडल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीचे संदेश सोशल मिडीयावर पोस्ट करणा-या ऑनलाईन केंद्र चालकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्हयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२४) ४६०८५ (२५-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात कृषी विभागातील एकूण १०७१ पदे असून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयालयात सुमारे ५४५ रिक्त पदे भरण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत तसेच पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१) हे खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जळगाव कार्यालयाच्या अधिनस्त कृषि विभागाची गट-अ ते गट-ड संवर्गाकरिता एकूण १०७५ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ४९८ पदे भरलेली व ५७७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालिन मा.मंत्री(कृषि) यांना लेखी निवेदन दिले आहे. वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची (कृषि सेवेतील) ६९८ पदे मंजूर असून त्यापैकी ३७८ पदे भरलेली तर ३२० पदे रिक्त आहेत.

(२) शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. उक्त रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) पदावर दि.१८.११.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने १२ अधिकाऱ्यांना जळगाव जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. सदर पदांकरिता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील उर्वरित रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यात येतील.

वित्त विभाग शा.नि.दि.३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वरवाडा (ता. तलासरी, जि.पालघर) येथील वहिवाटीच्या शेतजमिनीवरुन स्थानिक आदिवासींना पारशी डेअरी लँड फार्मने हुसकावून लावल्याबाबत

(२५) ४६१६९ (०४-११-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरवाडा (ता.तलासरी,जि.पालघर) येथील पिढयांपिढया कसत असलेल्या वहिवाटीच्या शेतजमिनीवरुन स्थानिक आदिवासीना पारशी डेअरी लँड फार्म जबरदस्तीने हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत असल्याप्रकरणी तेथील आदिवासी एकता परिषदेच्यावतीने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी एकता परिषदेच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, तसेच या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) : (१), (२) व (३) मौजे वरवाडा, ता. तलासरी, जि. पालघर येथील आदिवासी समाजाच्या लोकांना गाव नमुना नंबर ७/१२ सदरी अभिलेखात नोंद असलेल्या आणि पिढ्यान-पिढ्या कसत असलेल्या वहिवाटीच्या शेतजमिनीवर शेती करण्यास पारशी डेअरी लँड फार्म यांचेकडून सतत आडकाठी करण्यात येत असून धाक, जुलूम जबरदस्तीने हुसकावून लावण्याच्या प्रयत्नाने उपजिविकेच्या साधनांपासून वंचित ठेवल्याबाबत, ग्रामसभेच्या परवानगीशिवाय सिमेंटच्या भिंतीचे कंपाऊंड सुरु करुन केलेल्या अन्यायाबाबत व इतर मुद्यांच्या अनुषंगाने पारशी डेअरी फार्म यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ अंतर्गत गुन्हा दाखल करून आदिवासीची जमीन त्यांना परत मिळावी याकरीता दिनांक २७.०४.२०२२ पासून जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार असल्याबाबतचे निवेदन संचालक, आदिवासी एकता परिषद यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, पालघर व जिल्हा पोलीस अधिक्षक, पालघर यांना निवेदन सादर केले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहायक जिल्हाधिकारी, डहाणू यांच्या अध्यक्षतेखाली तहसिलदार, तलासरी, पोलीस निरीक्षक, तलासरी, आदिवासी एकता परिषद व पारशी डेअरी व्यवस्थापन यांचे पदाधिकारी यांच्यासमवेत दिनांक २९.०४.२०२२ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये मौजे वरवडा, ता. तलासरी येथील सर्व्हे नं. १७३ व इतर जमिनीला केलेल्या भिंतीच्या कंपाऊंडच्या आतील भागात असलेल्या शेतक-यांना जमिनीतून जाणे-येणेसाठी १५ फूट रुंदीचा रस्ता उपलब्ध करून देण्यात आला असल्याबाबतचा अहवाल पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस स्टेशन यांनी दिनांक २८.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, पालघर यांना सादर केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १२.०२.२०२१ रोजीच्या आदेशानुसार मौजे वरवडा, ता. तलासरी येथील सर्व्हे नं. १७३ व इतर जमिनीला वॉल कंपाऊंड केले असून कंपाऊडच्या आतील भागात असलेल्या शेतक-यांना जमिनीतून जाणे-येणेसाठी १५ फूट रुंदीचा रस्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे.

चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये गवताचे गठठ्याकरिता मशीन उपलब्ध करून देण्याबाबत

(२६) ४६५३१ (०४-११-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत मुरघास बेलर (गवताचे गठ्ठे तयार करण्याचे मशिन) यासाठी सन २०१९-२० या कालावधीमध्ये केंद्र शासनाकडून ५० टक्के हिश्याचा प्राप्त निधी अखर्चित राहिलेला होता. सदर अखर्चिक निधीस केंद्र शासनाची सन २०२१-२२ या कालावधीमध्ये पुनर्ग्राहयता प्राप्त करून त्यापैकी सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती प्रवर्गासाठी प्रत्येकी ०१ युनिट याप्रमाणे एकूण ०२ युनिट बुलढाणा जिल्हयात वाटप करण्यासाठी एकूण रु.२०.०० लक्ष ५० टक्के केंद्र हिश्याचा निधी माहे फेब्रुवारी व मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वितरित करण्यात आला , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधी मधून युनिटची खरेदी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१९ -२० या कालावधीत निधी अखर्चित राहिल्याने सदर दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-१२-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सर्वसाधारण योजनेअंतर्गत खडक पुर्णा दुध उत्पादक सहकारी संस्था मर्या. देऊळगाव मही, ता.देऊळगाव राजा या संस्थेस रू.१०.०० लक्ष अनुदान दिनांक १६.११.२०२१ रोजी थेट लाभ हस्तांतरणाद्वारे वितरित करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पांतर्गत उर्वरित ५० टक्के रू.१०.०० लक्ष निधी संस्थेने स्वत: खर्च करून आवश्यक साधनसामुग्रीची खरेदी केलेली असून आतापर्यंत ५० मे.टन मुरघास तयार केलेला आहे.
(३) अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थी संस्थेच्या निवडीकरिता प्रसिध्दी देवूनही जिल्ह्यातील एकाही संस्थेने अर्ज सादर न केल्यामुळे या प्रवर्गासाठीचा ५० टक्के निधी रू.१०.०० लक्ष समर्पित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयात वैधता तारीख संपलेल्या किटकनाशकांची विक्री होत असल्याबाबत

(२७) ४६६५७ (०१-११-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केएसके ॲण्ड सप्लायर, एलएलपी अमरावती या कंपनीच्या गोदामात वैधता तारीख संपलेल्या किटकनाशकांची विक्री व साठवणूक केल्याचे दिनांक ७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदरहु शेतक-यांनी अधिकृत परवानाधारकांकडून किटकनाशके खते व बियाणे खरेदी करावे यासाठी शासनाने चौकशी करुन सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (३०-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे. अमरावती जिल्हयात स्थानिक अमरावती येथे मे. के. एस. के. सफायर ॲण्ड क्रॉप सायन्स एल.एल.पी. या किटकनाशके विक्री केंद्रावर दिनांक २७/१२/२०२१ रोजी वैधता तारीख संपलेली यु.पी.एल. कंपनीची किटकनाशके आढळून आलेली आहेत.
(२) शेतकऱ्यांनी अधिकृत परवानाधारकांकडून किटकनाशके, खते व बियाणे खरेदी करण्यासंबंधी जिल्हा, तालुकास्तरावरुन वृत्तपत्र व इतर माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.
प्रस्तुत प्रकरणी अमरावती जिल्हयात स्थानिक अमरावती येथे मे. के. एस. के. सफायर ॲण्ड क्रॉप सायन्स एल.एल.पी. या किटकनाशके विक्री केंद्राने यु.पी.एल. कंपनीचे (उलाला) Flonicamide ५०% WG बॅच क्रमांक FQ१ULL०१५१ चे २५० ग्रॅम वजनाचे १२ नग रु. ३८४००/- रक्कमेचे वैधता संपलेली किटकनाशके आढळून आलेली आहेत. त्यानुषंगाने सदर विक्रेत्याचा किटकनाशके परवाना रद्द करण्यात आलेला आहे. तसेच, विक्रेत्याविरुध्द किटकनाशके कायदा १९६८, किटकनाशक नियम १९७१ व भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत पोलिस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती येथे क्र. ०२१६/२०२२, दिनांक ०५/०५/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिस यंत्रणेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील संग्रहालयासाठी निधीची तरतूद करुन संग्रहालय पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत

(२८) ४६६८० (१७-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐतिहासिक महत्व असलेल्या सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) शहरातील संग्रहालयाला मान्यता मिळून १० वर्षे पूर्ण झाली तरी प्रत्यक्षात याठिकाणी ऐतिहासिक वस्तू ठेवून ते पर्यटकांसाठी खुले करण्यात आले नसल्याचे दि.१८/५/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष म्हणजे ५ वर्षापूर्वीच राज्य पुरातत्व विभागाकडे या संग्रहालयासाठी उभारण्यात आलेली इमारत हस्तांतरीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील वस्तूंचे दालन व सुशोभिकरण करण्यासाठी १० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून यासाठी पुरातत्व विभागाने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन निधीची तरतूद करुन सदरील संग्रहालयाचे अपूर्ण असलेले काम तातडीने पूर्ण करुन संग्रहालय पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-११-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत परिपूर्ण अंदाजपत्रक तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे.

(४) सिंदखेडराजा विकास आराखड्यांतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे संग्रहालयाचा प्रारूप विकास आराखडा तयार झाल्यानंतर निधीची मागणी करण्यात येणार आहे. संग्रहालयाच्या इमारतीतील एका दालनात तात्पुरते पाषाण शिल्प प्रदर्शनाची मांडणी करण्याचे नियोजित असून त्यासाठीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्याचे काम संचालनालय स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून कृषी योजना व बदल्यांमधे कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबत

(२९) ४६९२२ (०१-११-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी विभागातील अधिकाऱ्याकडून कृषी योजना व अधिकाऱ्यांच्या बदल्यामधे कोट्यवधी रूपयाचा गैरव्यवहार होत असल्याची तक्रार एका राष्ट्रीय पक्षाच्या सेलने सी.बी.आय. कडे केल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रारकर्त्यांने सदर तक्रार मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात सुध्दा केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२१-११-२०२२) : (१) नाही.

(२) होय

(३) मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या तक्रारीची छाननी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पिकविमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क होत नसल्याबाबत

(३०) ४७०५१ (२७-१०-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टी व गुलाब चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिकविमा काढलेल्या शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती देण्याकरिता विमा कंपन्यांनी टोल फ्री क्रमांक काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टोल फ्री नंबरवर शेतकऱ्यांनी संपर्क साधला असता संपर्क होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांची विमा कंपनीकडून होत असलेल्या दुर्लक्षतेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२१ मध्ये, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत चाळीसगाव (जि. जळगाव) तालुक्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ३३३० सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ३१८५ शेतकऱ्यांना रु.१५७.२८ लाख इतकी नुकसान भरपाई विम कंपनीमार्फत निश्चित करुन वाटप करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील रिक्त जागा भरण्याबाबत

(३१) ४७४८१ (२७-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील रिक्त जागा भरण्यात याव्यात अशी मागणी अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष यांनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२४-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सरळसेवा कोटयातील अंदाजे ७५ हजार पदे भरण्याचे शासनाचे उद्दिष्ट

असून त्यानुषंगाने वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/ प्र.क्र.२ /२०२२ /अ.पु.क.,दि.३१.१०. २०२२ अन्वये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आले असून त्यानुसार ज्या विभाग /कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा विभाग/ कार्यालयांतील गट-अ,गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ८०% पदे भरण्यास सहमती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पूर्व हवेली (जि.पुणे) तालुक्यातील गावांमध्ये अवैधरित्या वाळू चोरी होत असल्याबाबत

(३२) ४७५३९ (०१-११-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्व हवेली (जि.पुणे) तालुक्यातील अष्टापुर, कोळवडी, हिंगणगाव, लोणी काळभोर गावाच्या हद्दीतील मुळा मुठा नदीतील वाळूचा लिलाव शासनाकडून बंद आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावाच्या हद्दीतील मुळा-मुठा नदीपात्रातून जेसीबी, पोकलेन, ट्रॅक्टर हायवा डंम्परच्या सहाय्याने वाळू माफियांकडून अवैधरित्या वाळू चोरी होत असल्याची माहिती मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशीर नदीपात्रातील वाळू उपशामुळे २० फुटांचे मोठया खड्ड्यामुळे नदीच्या प्रवाहाची दिशा बदलून पाण्याचे प्रदूषण होत असल्याने पर्यावरणाची मोठी हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच अवजड वाहनातून होत असलेल्या वाळू वाहतुकीमुळे सदर परिसरातील रस्त्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या वाळू चोरी होत असल्याची तक्रार सदर गावातील ग्रामस्थ गाव कामगार तलाठी यांनी वारंवार तहसीलदार मंडल अधिकारी व उपविभागीय प्रांतअधिकारी हवेली यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त गावातील अवैधरित्या होत असलेल्या वाळूचोरीवर बंदी घालण्याकरता व त्यांची वाहने व साहित्य जप्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-११-२०२२) : (१) व (२) पुणे जिल्ह्यातील नद्यांमध्ये बारमाही पाणी असल्यामुळे वाळू उत्खननाचे लिलाव राज्य स्तरीय पर्यावरण समितीच्या आदेशानुसार काढण्यात आले नाहीत.

तथापि, पुणे जिल्हयातील ज्या नद्यांचे पात्र कोरडे होण्याच्या मार्गावर आहेत अशा नद्यांमधील वाळू भूखंडाचे लिलाव करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मौजे अष्टापूर व मौजे हिंगणगाव येथील मुळा- मुठा नदीपात्रात उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या संयुक्त भरारी पथकाने दि.७/५/२०२२ रोजी छापा टाकून दोन बोटी नष्ट करुन याबाबत संबंधितांविरुध्द लोणीकंद पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०२२५ अन्वये दि.७/५/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मौजे अष्टापूर- ते हिंगणगाव मुळा मुठा नदीपात्रामध्ये २४०० ब्रास अनाधिकृतपणे वाळू उपसा केल्याने श्री. नामदेव सुखदेव कोतवाल व श्री. सचिन गोरख थोरात यांचेविरुद्ध रुपये १२,१२,६४,८००/- इतक्या दंडाचे आदेश पारित केले आहेत. तसेच, मौजे अष्टापूर येथे ०४ ब्रास अनाधिकृत वाळू साठा केल्यामुळे श्री. सुखदेव बाबपुराव कोतवाल व इतर यांना रक्कम रुपये १,००,८००/- दंडाचे आदेश पारीत केले आहेत.
(३), (४) व (५) अशी बाब आढळून आली नाही.
(६) पुणे जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हा स्तरावर/उपविभागीय स्तरावर तसेच तालुका स्तरावर दक्षता पथकांमार्फत कडक मोहिम राबविण्यात येते.

दिनांक १/४/२०२२ ते दिनांक ३०/१०/२०२२ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४९ प्रकरणी रु.७९.८५ लाख इतक्या दंडात्मक रक्कमेची कारवाई करण्यात आली आहे. सदर दंडाच्या रकमेत वरील अ.क्र.२ मधील दंडाच्या रक्कमेचा समावेश नाही.अवैध वाळू वाहतुक प्रकरणी ३६ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वनक्षेत्र सह सर्वत्र वृक्षतोड होत असल्याबाबत

(३३) ४७५९८ (२५-०९-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वनक्षेत्रसह सर्वत्र मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असतानाही वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोकरदन तालुक्यात महाकाय वृक्षांची अवैधरित्या तोड होत असून दररोज सायंकाळी १५ ते २० ट्रॅक्टर मधून शहरातील सॉ मीलवर लाकडांची वाहतूक होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भोकरदन तालुक्यातील सॉ मीलवर विनापरवाना आणलेल्या लाकडाची खरेदी बंद करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, पर्यावरणाचे संतुल राखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-११-२०२२) : (१) जालना जिल्हा अंतर्गत जालना उत्तर वनपरिक्षेत्रात भोकरदन तालुक्याचे वनक्षेत्र विखुरलेले आहे. सदर भागात मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने पर्यावरणाचा होणारा ऱ्हास ही बाब माहे मे,२०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.
(२) भोकरदन तालुक्यात एकूण परवाना प्राप्त आरागिरण्यांची संख्या ०८ आहे.त्यापैकी १ आरागिरणी बंद असुन ७ आरागिरण्या कार्यरत आहेत. सदर आरागिरणीची मापदंडानुसार क्षेत्रीय कर्मचारी वनपाल, वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी स्ट्राईक फोर्स, औरंगाबाद हे वेळोवेळी तपासणी करतात. सदरचे आरागिरणीवर तपासणीमध्ये अवैध लाकुड माल वाहतुक झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) क्षेत्रीय स्तरावर तपासणी मध्ये भोकरदन तालुक्यातील ८ आरागिरणीवर अवैध वाहतुकीचा लाकुड माल आढळुन आलेला नाही.
(४) क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी वन संरक्षण मापदंडानुसार नियमित गस्त घालत असतात, नियमितरित्या कालबध्द नियतक्षेत्र तपासणी कार्यक्रम राबविण्यात येत असुन गुप्तहेरांचे जाळे निर्माण करण्यात आलेले आहे. तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांची वेळोवेळी संरक्षण कामात मदत घेण्यात येते. बेकायदेशीर कृत्य आढळल्यास वनगुन्ह्यानुसार तात्काळ कार्यवाही केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्याकरिता कृषि भवन उभारण्याबाबत

(३४) ४७७१६ (२८-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयाकरिता कृषि भवन उभारण्याचा निर्णय राज्य मंत्री मंडळाने माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाकरीता जागेची निश्चिती केली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत निधीची तरतूद व किती कालावधीत कृषि भवन पूर्ण होण्याचे शासनास अपेक्षित आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
सांगली जिल्ह्याकरीता कृषि भवन इमारत उभारण्याचा निर्णय अद्यापपर्यंत शासनाने घेतलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बीज प्रमाणीकरण यंत्रणाकडून प्रमाणित केलेल्या बियाण्यांची खात्री दिली जात असली तरी खाजगी कंपन्यांच्या सत्यप्रत (टुथफुल सीड्स) बियाण्यांची गॅरंटी कोणीच घेत नसल्याबाबत

(३५) ४७७३२ (३०-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बीज प्रमाणीकरण यंत्रणाकडून प्रमाणित केलेल्या बियाण्यांची खात्री दिली जात असली तरी खाजगी कंपन्याच्या सत्यप्रत (टुथफुल सीड्स) बियाण्यांची खात्री कोणीच घेत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सत्यप्रत बियाणे कायदयाच्या चौकटीत आणण्याकरिता शासन कोणते प्रयत्न करीत आहे वा करणार आहे,
(३) तसेच प्रमाणितमध्ये बीजोत्पादन ते पॅकिंग अशा सर्व टप्प्यांवर प्रमाणीकरण यंत्रणेतील अधिकाऱ्यांचे लक्ष असल्याने संबधित प्रमाणीकरण अधिकाऱ्यांवर दोषारोपण कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१) व (२)

महाराष्ट्र राज्यात खाजगी कंपन्यांच्या सत्यप्रत (टुथफुल बियाणे) बियाण्यांचे प्रमाणिकरण बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून करण्यात येत नाही. बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ हे तिन्ही कायदे बियाणे व्यवसायाच्या नियंत्रणाकरीता लागू आहेत. गुण नियंत्रण विभागाकडून प्रमाणित व सत्यप्रत दोन्ही बियाण्याची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने बाजारात विक्री होत असलेल्या बियाण्याचे नमुने निरिक्षकांमार्फत घेतले जातात व शासनाच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले जातात. तसेच हंगामामध्ये मोहिम स्वरुपात विक्री केंद्राच्या तपासण्या केल्या जातात.

सत्यप्रत बियाण्यांमध्ये खाजगी कंपन्यांनी विकसित केलेल्या संशोधित वाणांचा मोठ्या प्रमाणात समावेश होत असतो. सदर वाणांची कृषि विद्यापीठ स्तरावर चाचणी घेतल्यानंतर त्या अहवालाच्या वाण छाननी समितीच्या शिफारशीअंती संशोधित वाण कंपन्यांच्या परवान्यात समावेश करण्यात येत असल्याने सत्यप्रत बियाणे हे कायद्याच्या चौकटीतच आहे.
(३) बीज प्रमाणीकरण कार्यपध्दतीनुसार सर्व टप्प्यांवर प्रमाणिकरण यंत्रणेतील अधिकारी यांचे मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून सद्यस्थितीत बीज प्रमाणिकरण यंत्रणेमधील संबंधित अधिकाऱ्यांवर दोषारोपण कार्यवाही करण्यासंदर्भात कोणतेही प्रकरण निदर्शनास आलेले नाही अथवा याबाबत क्षेत्रिय स्तरावर तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विटा (ता. खानापुर, जि.सांगली) शहरासह कोबडयांना खाद्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे दर वाढविल्याबाबत

(३६) ४७७४४ (२८-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापुर (जि.सांगली) तालुक्यात विटा शहरासह अन्य ठिकाणी कोबडयांना खाद्य तयार करण्यासाठी लागणा-या कच्च्या मालाचे दर वाढल्याने व अंडयाचे दर पडल्याने पोल्ट्री व्यावसायिकांचे दररोज लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खाद्यावरील दर वाढल्यामुळे व्यवसायिक अडचणीत आला असून पोल्ट्रीधारकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खाद्यावरील दर वाढविण्यामागची कारणे काय आहेत तसेच दर कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) कुक्कुट खाद्यासाठी लागणारे विविध घटक यांचे उत्पादन व मागणी याप्रमाणात बाजारपेठेतील कुक्कुट खाद्यांचे दर कमी जास्त होत असतात.

तथापि, खाजगी कंपन्या अथवा सहकारी संस्थांमार्फत विक्री करण्यात येत असलेल्या कुक्कुट खाद्याचे दर पशुसंवर्धन विभागामार्फत निश्चित केले जात नाहीत व त्यावर या विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही.

तथापि, खाजगीरित्या कुक्कुट पालन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्या यांना कुक्कुट पालन व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी दिनांक २१.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली कुक्कुट व्यवसाय करणारे शेतकरी, अंडी उत्पादन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपनी यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असणाऱ्या राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने चरस, गांजा, ब्राऊन शुगर अशा अंमली पदार्थासंबंधीत उत्पादनावर कारवाई करण्याबाबत

(३७) ४७७४५ (१२-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाला चरस, गांजा, ब्राऊन शुगर अशा अंमली पदार्थाचा साठा करणे व विक्री तसेच यासंबंधीत व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार असतानाही सांगली जिल्हयात मात्र वर्षानुवर्षे राज्य उत्पादन शुल्काकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभाग म्हणजे केवळ दारुच्या संबंधित कारवाई करणारा विभाग असा सर्वसामान्यांचा गैरसमज होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू विभागाकडून अंमली पदार्थांसंबंधीत कारवाई करण्यास टाळाटाळ करण्याबाबतची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त अंमली पदार्थांसंबंधीत कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१३-१२-२०२२) : (१) ते (४) राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत प्रामुख्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री इ. वर कारवाई केली जाते. अंमली पदार्थावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी नार्कोटिक ड्रग्स ॲन्ड साइकोट्राफीक सबस्टन्सेस (एन.डी.पी.एस.) कायदा, १९८५ या केंद्र शासनाने केलेल्या कायद्यातंर्गत कारवाई करण्याचे अधिकार केंद्रीय स्तरावरील यंत्रणांना तसेच, राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभाग, पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागांना आहेत. त्यानुसार सदर कायद्याचे उल्लंघन होत असल्यास त्याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत आवश्यक ती उपाययोजना करण्यात येते. सांगली जिल्ह्यात सदर कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत कोणतीही तक्रार राज्य उत्पादन शुल्क विभागास प्राप्त झाली

नसल्याने या कायद्यांतर्गत या जिल्ह्यात या विभागामार्फत कारवाई करण्यात आलेली नाही. नार्कोटिक ड्रग्स ॲन्ड साइकोट्राफीक सबस्टन्सेस (एन.डी.पी.एस.) कायदा, १९८५ अंतर्गत प्रभावीपणे कारवाई व्हावी म्हणून या विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून या कायद्यातील प्रमुख तरतूदी व कायद्याची अंमलबजावणी करताना घ्यावयाची दक्षता याबाबत सविस्तर सुचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्यामार्फत देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

बीबीएफ पेरणी तंत्रज्ञानची माहिती शेतकऱ्यापर्यंत दिली जात नसल्याबाबत

(३८) ४७८१० (०२-११-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीबीएफ पेरणी तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांचे अत्यंत फायद्याचे असल्याने या तंत्रज्ञानाचा वापर वाढावा यासाठी मंडळनिहाय कार्यशाळा स्थानिक लोकप्रतींनिधीच्या उपस्थितीत आयोजित करण्याबाबत माहे मे, २०२२ मध्ये वा त्यासुमारास खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत मा.पालकमंत्री लातूर यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर यांना निर्देश दिले , हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरील तंत्रज्ञानाची गावपातळीवर प्रसिध्दी,प्रसार व प्रात्यक्षिके करून दाखवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी लातूर यांनी बीबीएफ पेरणी तंत्रज्ञानाची गावपातळीवर प्रसिध्दी, प्रसार व प्रात्यक्षिके करुन दाखविण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही केली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये कृषि सहाय्यकांनी व्हॉटस ॲप ग्रुप तयार करुन त्यावर शास्त्रज्ञाचे लेख, व्हिडीओ द्वारे बीबीएफ तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार केला. तसेच दिनांक २५.६.२२ ते ३०.६.२२ च्या दरम्यान प्रत्येक गावात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेतकरी मेळावे, शेतीशाळा, प्रशिक्षण घेऊन मार्गदर्शन व प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आली. दिनांक १.७.२२ रोजी कृषि दिनानिमित्त श्री. प्रशांत पाटील, प्रगतीशील शेतकरी यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या कृषी विभागाअंतर्गत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा योजनेबाबत

(३९) ४७८८४ (२८-१०-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगावं) तालुक्यातील शासनाच्या कृषी विभागाअंतर्गत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा योजना राबविण्यात येत असुन या योजनेअंतर्गत शेतक-यांना मोठया प्रमाणात फायदा होत आहे, त्यामुळे १२९ गावांपैकी केवळ ३१ गावांचा पोकरा योजनेतंर्गत समावेश झाल्याने अन्य गावांतील शेतकऱ्यांत नाराजी पसरली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत शेतक-यांच्या जीवनाचा कायापालट होऊन अनुदान प्राप्त होते त्यामुळे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात लाभ होतो परंतू या योजनेअंतर्गत ज्या गावांचा समावेश झालेला नसतो त्या गांवातील शेतक-यांमध्ये नाराजी पसरते यामुळे तालुक्यातील सर्व गांवाचा समावेश या योजनेमध्ये होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२५-११-२०२२) : (१) नाही, अशी बाब नाही.
दिनांक १७ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये पाचोरा तालुक्यातील ३१ गावांसह जळगाव जिल्ह्यातील ४६० गावांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(२) प्रकल्पामध्ये समाविष्ट नसलेल्या गावांमधील शेतकऱ्यांना विहित कार्यपध्दतीनुसार महाडीबीटी पोर्टलद्वारे कृषि विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी सहाय्यक यांना ग्रामपंचायतीमध्ये बसण्यासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत

(४०) ४८००५ (३०-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यासाठी विविध योजना कृषी सहाय्यक यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असून शेतकऱ्यांच्या दैनंदिन संपर्कासाठी कृषी सहाय्यक यांना त्या त्या गावातील ग्रामपंचायत इमारतीत कामकाजासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच सदरील कृषी सहाय्यक यांचे हालचाल नोंद वही ग्रामपंचायत मध्येच शेतकऱ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लातूर जिल्हा खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पालकमंत्री महाराष्ट्र राज्य लातूर यांच्याकडे मागणी केली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, प्रत्येक कृषी सज्जाच्या ठिकाणी कृषी सहाय्यक कार्यालय करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे काय, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१) व (२) करीता लातूर जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीच्या दिनांक १७.०५.२०२२ रोजीच्या इतिवृत्तानुसार अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्याबाबत कोणताही उल्लेख आढळून येत नाही.
कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील कृषि सहाय्यकांना गावातील ग्रामपंचायत इमारतीत कामकाजासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त (कृषि) यांनी प्रस्ताव सादर केला होता. तद्नुषंगाने कृषि सहाय्यकांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये किमान १५० ते २०० चौ.फूट जागा कार्यालयीन दस्तऐवज ठेवण्यासाठी व कार्यालयीन कामकाजासाठी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ०९.०९.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात मिश्रखत तयार करणाऱ्या सहकारी संघ व खाजगी कारखान्यांना कच्चा माल पुरविण्याची मागणी संघाकडून कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडे केल्याबाबत

(४१) ४८०१४ (३०-१०-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील मिश्रखत तयार करणाऱ्या सहकारी संघ व खाजगी कारखान्यांना कच्चा माल पुरविण्याची मागणी संघाकडून होत असून कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या कार्यालयाकडे केली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने मिश्रखत उत्पादनास लागणाऱ्या कच्चा माल व खरेदीस परवानगी दिली असून कृषि विभागाच्या शिफारशीनुसार मिश्रखताच्या ग्रेड १८:१८:१०, १०:२०:२०, २०:१०:१० व २०:२०:० या चारही ग्रेडच्या उत्पादनसाठी मिश्रखत निर्मितीसाठी परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून एकाच म्हणजे १८:१८:१० या ग्रेडच्या उत्पादनास मंजूरी दिली जात असल्यामुळे वरील नमुद चारही ग्रेडना कच्चा माल उपलब्ध करुन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मिश्रखत निर्मिती करणारे सहकारी संघ यांच्या मागणीनूसार कच्चा माल पुरवठा करण्याबाबत शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०१-१२-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) केंद्र शासनाच्या दिनांक ९/११/२०२१ आदेशानुसार मिश्रखत उत्पादकांच्या एकूण उत्पादन क्षमतेच्या २५ टक्के उत्पादन क्षमतेइतके १८:१८:१० मिश्रखत उत्पादन करण्यासाठी आवश्यक कच्चा माल जसे की, युरिया, डिएपी, एमओपी व एसएसपी यांची खरेदी करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यातील जिल्हा कृषी अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

(४२) ४८१८६ (३०-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयात कृषी अधिकारी पद मागिल चार महिन्यापासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु जिल्हयात कृषी विभागात प्रभारी अधिकारी नियुक्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी विशेषतः पोकरा योजनेतंर्गत अनेक शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले असून, अद्यापही शेतकऱ्यांच्या अर्जाची छाननी किंवा पुढील प्रक्रिया झाली नसल्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी विभागाच्या विविध योजनापासून वंचित रहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्हयाला पूर्ण वेळ जिल्हा कृषी अधिकारी नियुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०६-१२-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
जालना जिल्हयातील शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प (पोकरा) व कृषि विभागाच्या इतर योजनांचा लाभ घेण्यासाठी केलेल्या ऑनलाईन अर्जांनुसार त्यांना विविध घटकांचा लाभ विहित प्रक्रिये अंती देण्यात आलेला आहे / येत आहे.
(४) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनेक नागरिकांनी व शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतल्याबाबत

(४३) ४८३१८ (०६-१०-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकरी व नागरिकांना कर्ज मिळण्याचे सर्व मार्ग बंद झाल्याने सन २०२१ या वर्षात ७ लाख ८८ हजार ७०६ शेतकरी व नागरिक यांनी १२ हजार परवाना धारक सावकारांकडून १ हजार ७०० कोटी रुपयांचे कर्ज घेतल्याचे दिनांक ३१ मार्च,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकारांकडून कर्ज घेतल्याने या नागरिकांची व शेतक-यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शेतकरी व नागरिक हे फसवणूकीला बळी पडू नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (२४-११-२०२२) : (१) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात १२,०४९ परवानाधारक सावकारांनी ७,१४,६३२ शेतकरी व नागरीकांना रु. १५२० कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप केले आहे.

(२) नाही.

सावकारांकडून होणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांच्या पिळवणूकीस प्रतिबंध करणे तसेच समुचित व कठोर उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ हा कायदा दिनांक ०४.०४.२०१४ रोजीपासून लागू करण्यात आला आहे.

(३) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ हा कायदा लागू झाल्यापासून मार्च २०२२ अखेर राज्यात अवैध सावकारीबाबत ८८२१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ७३७४ तक्रारींची चौकशी पुर्ण झालेली आहे. सदर ७३७४ तक्रारींपैकी ८८७ तक्रारीत तथ्य आढळलेले असून त्यापैकी ८२५ तक्रारींमध्ये जिल्हा निबंधकांनी सावकारी अधिनियमाच्या कलम १८ (२) अन्वये कारवाई करुन संबंधीतांना ४७३ हेक्टर जमीन परत केलेली आहे. तसेच ४०७ दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

अवैध सावकारी करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरावर संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तीन सदस्यांची समिती दिनांक ०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या नियमित बैठका होत असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यासह धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून देण्यात येणाऱ्या कांदा चाळीसाठी मिळणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत

(४४) ४८४१३ (३०-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून देण्यात येणाऱ्या कांदा चाळीसाठी मिळणारे अनुदान अतिशय कमी स्वरूपाचे असून महागाई वाढल्याच्या दृष्टीने सदर अनुदान वाढवून देण्यात यावे, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक १३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (२२-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०१४-१५मध्ये कांदाचाळ उभारणी या घटकाकरिता केंद्र शासनाने मार्गदर्शक सुचना व मापदंड निश्चित केलेले आहेत. सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने, सदर योजनेचा सुधारित मापदंड निश्चित करुन मिळण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे.

कांदाचाळ या घटकाकरीता केंद्र शासनाचे ५० टक्के अनुदान रक्कम रु.३५००/ मे.टन. व पुरक (वाढीव) अनुदान रक्कम रु.१५००/मे.टन.असे एकूण रक्कम रु.५०००/मे.टन करणेकरीता प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. कांदाचाळ या घटकाची दर निश्चिती करणे हे केंद्रशासनाच्या आखत्यारीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे इस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) येथे बनावट दारु साठा सापडल्याबाबत

(४५) ४८४३८ (०९-१०-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) येथे राज्य उत्पादन शुल्क, नांदेड विभागाच्या भरारी पथकाने छापा मारला असता श्री.प्रशांतगौड रामलु भैरवगोणी या इसमाकडे बनावट दारू, एक चारचाकी वाहन व भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) असे जवळपास रुपये ५,३३,२००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू छाप्या दरम्यान श्री.प्रशांतगौड रामलु भैरवगोणी पळून गेला असून याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ए.ई.) ८०, ८१, ८३, ९० व १०८ अन्वये दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू छाप्यामध्ये आढळून आलेल्या बनावट दारुच्या साठ्याची पाहणी केली असता आढळून आलेल्या माहितीच्या आधारे मौजे इस्लामपूर येथील श्रीमती अनिता सुरेश जैस्वाल व श्री.प्रकाश नाराणदार रिजवानी यांची भागीदारी असलेल्या देशी दारु किरकोळ विक्री अनुज्ञप्ती दुकान क्रमांक १७०/२१-२२ ची तपासणी केली असता सदरहू ठिकाणी बनावट दारुचा साठा आढळून आला, सदरहू दारुचा साठा व यापूर्वी श्री.प्रशांतगौड रामलु भैरवगोणी यांचेकडे सापडलेला बनावट दारूचा साठा हा एकच असून तो सी.एल.-३ अनुज्ञप्तीच्या मंजूर जागेतून आणला असल्याचे आढळून आले, श्री.प्रशांतगौड रामलु भैरवगोणी, श्रीमती अनिता सुरेश जैस्वाल व श्री.प्रकाश नाराणदार रिजवानी यांची भागीदारी असलेल्या देशी दारु किरकोळ विक्री दुकानात नोकर म्हणून काम करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्रीमती अनिता सुरेश जैस्वाल व श्री.प्रकाश नाराणदार रिजवानी यांचेवर मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करुन त्यांची राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत चौकशी करुन कारवाई केली आहे काय, त्याचा तपशील काय आहे, याप्रकरणी कारवाईस विलंब करणारे संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांचेवर शासन कोणती कारवाई किती कालावधीत करणार आहे, श्रीमती अनिता सुरेश जैस्वाल व श्री.प्रकाश नाराणदार रिजवानी यांचेवर किती कालावधीत गुन्हे नोंदविण्यात येणार असून त्यांना अटक करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (०१-१२-२०२२) : (१) हे खरे आहे.

तथापि, सदर कारवाई दि.११.१२.२०२१ रोजी करण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

श्री प्रशांतगौड रामलु भैरवगोणी हे सीएल-३ अनुज्ञप्ती क्र.१७० मध्ये भागीदार नसून नोकरनामाधारक म्हणून काम करत होते.

(४) या गुन्ह्यातील आरोपी खालीलप्रमाणे आहेत.
१) श्री प्रशांतगौड रामलु भैरवगोणी
२) श्रीमती अनिता सुरेश जैस्वाल
३) श्री प्रकाश नारायणदास रिझवाणी
वरीलपैकी आरोपी क्र.१ यांना मा.प्रथम वर्ग न्यायालयाने एक्साईज कोठडी मंजूरी केली होती. आरोपी क्र.३ यांनी मा.अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड यांचेकडे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज क्र.८१/२०२२ सादर केला होता. मा.न्यायालयाने त्यांचे आदेश दि.२८.२.२०२२ अन्वये सदर अर्ज फेटाळला आहे.

आरोपी क्र.२ व ३ यांना तपासी अंमलदारासमोर चौकशीसाठी उपस्थित राहण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४१ (अ) अन्वये नोटीस देण्यात आली होती. ते अनुक्रमे दि.९.५.२०२२ व दि.२३.५.२०२२ रोजी चौकशीसाठी हजर झाले. त्यांचा गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभाग दिसून न आल्यामुळे परंतू ते अनुज्ञप्तीधारक असल्यामुळे त्यांच्या अनुज्ञप्तीमध्ये गैरप्रकार घडू नये म्हणून पर्याप्त काळजी घेतली नसल्यामुळे महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ७८, ७९, ८२ व ९० अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणात मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या दि.११.५.२०२२ च्या आदेशान्वये मौजे इस्लापूर, ता.किनवट, जि.नांदेड येथील सीएल-३ अनुज्ञप्ती क्र.१७० कायमस्वरुपी रद्द करण्यात आली आहे. सदर आदेशाविरुध्द अनुज्ञप्तीधारक यांनी दाखल केलेले अपील क्र.२१३/२०२२ या प्रकरणी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या दि.७.७.२०२२ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांचे आदेश कायम केले आहेत. सद्यःस्थितीत सदर अनुज्ञप्ती बंद आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत बी - बियाणे, खते व फवारणी औषधे मिळण्याबाबत

(४६) ४८६३६ (०३-११-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत बी - बियाणे, खते व फवारणी औषधे दिली जात नसल्याचे दिनांक १० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी किवा ग्रामीण भागातील सात - बारा धारक शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनेनुसार उपरोक्त शेती उपयुक्त साहित्य देणे क्रमप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) तसेच, कल्याण महानगरपालिका हद्दीतील भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक बी - बियाणे, खत व फवारणी औषधे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) खरीप हंगाम २०२२ मध्ये कल्याण तालुक्यात (शहरी भाग वगळुन) ग्रामीण भागातील भात उत्पादक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना व जिल्हा परिषद सेस योजनेच्या माध्यमातून भात बियाणे १४६.५ क्विंटल ५० टक्के अनुदानावर पात्र शेतकऱ्यांना वितरीत केलेले आहे. रब्बी हंगामात ५९.४० क्विंटल हरभरा बियाणे १०० टक्के अनुदानावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान योजनेअंतर्गत वितरीत केलेले आहे.

राज्य शासनाच्या योजने व्यतिरिक्त कल्याण तालुक्यात खरीप हंगाम २०२२ मध्ये १० कृषि सेवा बियाणे केंद्रा मार्फत भात बियाणे १२२४.२९ क्विंटल, १७ परवानाधारक रासायनिक खत विक्रेत्यांमार्फत रासायनिक खते ७७०.९७ मे.टन तालुक्यात मागणीप्रमाणे खते उत्पादक कंपन्यांनी विक्रेत्यांमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदरची रासायनिक खते शासकिय दराने शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येतात. माहे ऑक्टोबर अखेर कल्याण तालुक्यात

६८७.०३ मे.टन एवढ्या खतांची विक्री झालेली आहे. तसेच कल्याण तालुक्यात भाताच्या विविध वाणांचे महाबीज, राष्ट्रीय बीज निगम व खाजगी कंपन्यांचे वियाणे लागवडीकरीता उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील हद्दीत कांदळवनाची तोड होत असल्याबाबत

(४७) ४८८१० (२५-०९-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत कांदळवन नष्ट होण्याच्या तक्रारींवर कारवाई करण्यास महसूलसह महानगरपालिका व कांदळवन विभाग टोलवाटोलवी करित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोकण कांदळवन समितीपासून स्थानिक पालिका, पोलीस, महसूल आदींना तक्रारी करुन देखील कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,कांदळवन नष्ट केल्याबाबत वारंवार तक्रारी करुनही अधिकारी पर्यावरणाचा नाश करणाऱ्यांना भ्रष्ट मार्गाने वाचविण्याचे काम करत असून संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी तेथील स्थानिक पर्यावरणप्रेमी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसचे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-११-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत कांदळवन नष्ट झाल्यासंबंधी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या कार्यालयास एकूण ६ तक्रारी प्राप्त झाल्या त्यापैकी ३ तक्रारींची चौकशी पूर्ण करण्यात आली असून उर्वरित ३ तक्रारींमध्ये चौकशी सुरु आहे.
मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत कांदळवन नष्ट झाल्यासंबंधी कोंकण कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीमध्ये माहे जून, २०२२ अखेर एकूण ३८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १८ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित २० तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांच्याकडून संबंधीत स्थानिक पालिका, पोलीस, महसूल विभागास निर्देश देण्यात आले आहेत.
तसेच मिरा भाईंदर क्षेत्रातील अपर तहसिलदार कार्यालयात कांदळवन ऱ्हासाबाबत प्राप्त १९ तक्रारींच्या अनुषंगाने अपर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.६.२०२२ रोजी कांदळवन उपसमितीचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला होता. सदरच्या स्थळपाहणीनुसार एकुण ३ वाणिज्य वापराची कच्ची बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हा तसेच विभागामध्ये नायब तहसीलदारांची ११० पदे रिक्त असल्याबाबत

(४८) ४८८३२ (३०-१०-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा तसेच विभागात २८७ मंजूर पदांपैकी नायब तहसीलदारांची ११० पदे रिक्त आहे त्यामुळे महसुल विभागाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांच्या कामाचा ताण इतर नायब तहसीलदारांवर येत असून नागरिकांच्या कामाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार येथील नायब तहसीलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) : (१) अमरावती विभागात नायब तहसिलदार संवर्गाची २८७ पदे मंजूर आहेत, हे खरे आहे,
अमरावती विभागात सध्या ७८ पदे रिक्त आहेत.
(२), (३) व (४)

शासन आदेश दिनांक २७.०७.२०२२ अन्वये अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील एकुण ४६ कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली असून उर्वरीत ७८ रिक्त पदांचा कार्यभार संबंधित जिल्हाधिकारी यांनी इतर अधिकारी/कर्मचारी यांचेकडे अतिरिक्त स्वरूपात सोपविलेला आहे.

याशिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयेगाकडून निवड झालेल्या सीपीटीपी-७ अंतर्गत ११३ व सीपीटीपी-८ अंतर्गत ७३ परिविक्षाधिन नायब तहसिलदार प्रशिक्षण घेत असून, सदर अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर अमरावती विभागासाठी उपलब्ध होतील.

राज्यात बोर्डी, रामापुर, धारूर व लाडेगाव (ता.अकोट, जि.अकोला) परिसरातील शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकासोबत सफेद मुसळी वन औषधांची शेती केली असल्याबाबत

(४९) ४८९९६ (३१-१०-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बोर्डी, रामापुर, धारूर व लाडेगाव (ता.अकोट, जि.अकोला) परिसरातील शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकासोबत सफेद मुसळी वन औषधांची शेती केली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील शेतकऱ्यांना मुसळी वनऔषधाच्या अनुदानासाठी मागील तीन वर्षांपासून वंचित रहावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सफेद मुसळी या वनौषधीला कृषी विभागाने मान्यता देऊन अद्यापर्यंत अनुदान न देण्याची कारणे काय आहेत, तसेच या उक्त वनौषधीसाठी शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. संदीपानराव भुमरे (२२-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०१९-२० मध्ये अकोला जिल्हयातील १४ लाभार्थ्यांना ६.७४ हे. साठी रु. २.०२ लक्ष अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

केंद्र शासनाने औषधी वनस्पती लागवड घटक हा सन २०२०-२१ पासून राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रमाचा भाग राहणार नाही, असे कळविले असून राज्याने पाठविलेल्या सन २०२०-२१ व सन २०२१-२२ च्या वार्षिक कृती आराखडयास मंजुरी दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने जाहीर केलेली "बांधावर खत" योजना फक्त कागदावरच राहिल्याबाबत

(५०) ४९२७९ (३१-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खतांचा काळाबाजार होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना "बांधावर खत" ही योजना शासनाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी गावामध्ये गट तयार करुन मागणी नोंदविल्यास मार्केटिंग फेडरेशन किंवा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत बांधावर शेतकऱ्यांना खत पुरवठा करण्याची योजना होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधावर खतवाटप योजनेचे प्रयोजन किंवा कागदोपत्री प्रस्तावच नसल्याचे अनेक जिल्ह्यात कृषी विभागाकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बांधावर खत मिळण्याबाबत अद्यापही शासनाने कोणतेही प्रयत्न केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दर वर्षी होणारा खतांचा तुटवडा, कृत्रिम टंचाई, खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (३०-११-२०२२) : (१) "बांधावर खत योजना" अशी कोणतीही योजना मंजुर नाही. मात्र ,सन २०२०-२१ व२०२१-२२ वर्षामध्ये कोविड साथीमुळे रासायनिक खत वाहतुकीला मर्यादा येत होत्या .त्यावेळेस प्रत्येक शेतकऱ्यास खतांची वाहतुक करण्यास परवानगी देणे शक्य नव्हते. त्यामुळे,शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनीला रासायनिक खताची वाहतुक करण्यास कृषि विभागामार्फत परवानगी देऊन "बांधवर खत मोहिम" राबविण्यात आली होती त्याअंतर्गत शेतकरी गटांनी शेतकयांपर्यंत खत पोच केले होते.

(२) शेतकऱ्यांच्या गटाला, शेतकरी उत्पादक कंपनीला एकत्रितरित्या खत खरेदी करता येते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रत्येक वर्षी राज्यामध्ये रासायनिक खतांचा तुटवडा भासणार नाही याची दक्षता कृषि विभागाकडून घेतली जाते. सन २०२२-२३ मध्ये माहे एप्रिल २०२२ मध्ये १२.१५ लाख मे. टन व माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये १४.६१ लाख मे. टन खताचा साठा राज्यामध्ये उपलब्ध होता. खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यामध्ये एकूण ३९६ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याप्रमाणे, एकूण ४५ तक्रार निवारण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. दि. १/०४/२०२२ अखेर ११,११० नमुने काढण्यात आले असून १०८२ अप्रमाणित नमुन्यांपैकी ८०९ नमुने न्यायालयीन दावे पात्र नमुने असून त्यापैकी ०७ कोर्टकेस दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.